# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@mercindia.org.in वेबसाईट: www.mercindia.org.in

## जाहीर सूचना

**सन २०१२ चे प्रकरण क्र.१०** **जाहिरात क्र.२१/२०११–१२**

## आर्थिक वर्ष २०१२–१३ साठी नूतनशील ऊर्जा वीज दराबाबत (आयोगाने स्वत:हून तयार केलेल्या) प्रारुप आदेशावर सुनावणी

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० च्या विनियम ८ च्या अनुरोधाने महाराष्ट्र राज्यात आर्थिक वर्ष २०१२–१३ साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता व्यापक (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणाबाबत आयोगाने स्वत: प्रारुप आदेश तयार केला आहे. सदर प्रारुप आदेश आयोगाच्या **www.mercindia.org.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. वरील प्रारुप आदेशावर, आयोग, जनतेकडून हरकती आणि सूचना मागवित आहे. या हरकती आणि सूचना आयोगाचे सचिव यांना, **१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५** येथे, **(फॅक्स: ०२२–२२१६३९७६ ई–मेल: mercindia@mercindia.org.in**) या पत्त्यावर **दि. २ मार्च, २०१२** रोजीपर्यंत मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

३. ज्या व्यक्तींना हरकती आणि सूचना पाठवावयाच्या असतील त्यांनी हरकती आणि सूचना वरील पत्त्यावर इंग्रजी अथवा मराठीत (६ प्रतींमध्ये) पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि असल्यास ई–मेलचा उल्लेख करावा. तसेच जर कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. जर हरकती आणि सूचना पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे. **सेंट्रम हॉल, १ ला मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५ येथे बुधवार, दि. ७ मार्च २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता** याबाबत आयोगासमोर जाहीर सुनावणी होणार आहे. सुनावणीच्या वेळी ज्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असेल अशा व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल. या सुनावणीची वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

सही/–
**(कुलदीप ना. खवारे)**
सचिव, मविनिआ

दिनांक : १.०२.२०१२
ठिकाण : मुंबई